# सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना अंतर्गत अनुदान वाटप




राज्य लोकसंख्या धोरण कुटूंबकल्याण कार्यक्रमांतर्गत सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना दारिद्रय रेषेखालील जोडप्यांना मुलगा नसताना त्यांनी एक किंवा दोन मुलींच्या जन्मानंतर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेतल्यास त्यांच्या मुलींकरीता विशेष प्रोत्साहनात्मक योजना राबविण्यात येते. त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील दोन लाभार्थ्यांना दिनांक ९/७/२०१५ रोजी मा.महापौर सौ.अपेक्षा विकास पाटील व मा.उप महापौर सौ.पंचशीला नाना पवार यांचे हस्ते व मा.आयुक्त श्री.मनोहर हिरे यांच्या उपस्थितीत अनुदानाचे वाटप करण्यात आले. या अंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला रु.२,०००/— रोख स्वरुपात व प्रत्येक मुलीच्या नांवे रु.४,०००/— याप्रमाणे रु.८,०००/— राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरुपात देण्यात आले. लाभार्थ्यांची नांवे श्रीमती अर्चना अंकुश वाघमारे व श्रीमती रेखा शिवाजी गायकवाड अशी आहेत.